**College of Agricultural Engineering and Technology**
**Dr. BALASAHEB SAWANT KONKAN KRISHVIDYAPEETH,**
**DAPOLI, DIST. RATNAGIRI.**
**Phone: (02358) 282414; Tel –Fa x: (02358) 282414**
**Email :- caetfs@gmail.com**

**Dr. Y. P. Khandetod**
Associate Dean

No. CAET/FS/AICRP-PEASEM/Quotation /1921/ of 2020
Date: 18 DEC 2020

प्रति,

.....................................

.....................................

विषय:— AICRP- PEASEM प्रक्षेत्रावरील झाडे तोडण्यासाठी व तोडलेली लाकडे एका ठिकाणी ठेवण्यासाठी कंत्राटी कामासाठी दरपत्रक पुरविणेबाबत..

महाशय,

कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली च्या AICRP- PEASEM च्या संशोधन प्रक्षेत्रावरील काजुची झाडे व बांबुची बेटे तोडणे तसेच बांधावरील अडथळा आणणारी झाडे छाटणे या कंत्राटी कामांसाठी दरपत्रके मागवण्यात येत आहेत. कंत्राटदाराने प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाची पाहणी करूनच दपरपत्रक भरावेत. सदर दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात भरून **मा. सहयोगी अधिष्ठता, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जिल्हा— रत्नागिरी, पिन कोड नं. ४१५७१२** यांच्या नावे दि. २८/१२/२०२० पर्यत पाठविण्यात यावेत. लिफाफ्यावर वरील बाजूस ठळक अक्षरात **"AICRP- PEASEM दरपत्रक"** नमुद करावे. सदर कामाचे ढोबळ स्वरूप खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे. मात्र कंत्राटदाराने प्रत्यक्ष काम पाहून प्रक्षेत्र अधिकारी (AICRP- PEASEM) यांच्याशी चर्चा करूनच दरपत्रक भरावेत, मागाहुन कोणतीही तक्रार चालणार नाही. तरी खालीलप्रमाणे तोडणी/छाटणी करावायाच्या प्रक्षेत्रावरील झाडांची सद्य:स्थिती व कामाचा आराखडा यांची माहिति सोबतच्या नकाशात जोडण्यात येत आहे. मात्र, तरीसुध्दा प्रत्यक्ष कामाची पाहणी करूनच दरपत्रक भरावे. सोबत जोडलेल्या नमुन्यातच दरपत्रक सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | किंमत (रू.) |
|---|---|---|
| १. | अ. प्रक्षेत्रावरील १६२ काजूची झाडे जमिनीपासुन अर्धा फुट अंतरावर तोडणे, तसेच तोडलेल्या झाडांपासुन **१ इंच पेक्षा जास्त जाडी** असलेले लाकडे वेगळी करणे व त्याचा ढिग लाकडांच्या जाडी प्रमाने नेमुन दिलेल्या एकाच ठिकाणी लावून ठेवणे. तसेच लाकडे वेगळे केल्यानंतर उरलेला पाळापाचोळा व बारीक फांद्यासह नेमुन दिलेल्या जागेवर एका ठिकाणी गोळा करणे.<br>**टिप: लाकडाचा ढीग २ मीटर रूंदीच्या, २ मीटर उंचीच्या आणि लांबी गरजेनुसार जागेतच लावणे.**<br>**ब.** लावलेले बांबूचे १० बेटे जमिनीपासुन अर्धा फुट उंचीवर तोडणे व शेंडयापासुन बांबु वेगळा करणे व त्याचा ढिग एकाच ठिकाणी लावून ठेवणे. तसेच बांबुचा राहीलेला पाळापाचोळा इतर पाळापाचोळयाबरोबर टाकणे.<br>क. प्रक्षेत्राच्या बांधावरील अडथळे आणणारे ११ झाडे जमिनीपासुन ११ फुट अंतरावर छाटणे तसेच छाटलेली मोठी लाकडे नमुद केलेल्या जागेवर ३ मीटर रूंदीच्या, २ मीटर उंचीच्या आणि लांबी गरजेनुसार लावुन ठेवणे.<br>**(टिप:. कंत्राटदाराने प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर भेट देऊन कामाची पाहणी करून व प्रत्यक्ष प्रक्षेत्र अधिकारी AICRP- PEASEM यांच्याशी कामाची चर्चा करूनच कंत्राटी कामाचे दरपत्रक भरावेत.)** | रू............ |



Scanned with CamScanner

**नियम व अटी:**

१. दरपत्रकात नमुद केलेले दर सर्व करांसहीत, वाहतुक व इतर सर्व खर्चासहीत असावेत.
२. सदर दरपत्रक दापोली ठिकाणासाठी द्यावेत.
३. प्रक्षेत्र अधिकारी **AICRP- PEASEM** यांच्याशी प्रत्यक्ष कामाची चर्चा करूनच दरपत्रक भरावेत.
४. मंजुर दरपत्रकाशिवाय सदर कामाचे अतिरिक्त कोणतीही रक्कम अदा करता येणार नाही.
५. सदर कामाच्या वाहतुकीचे अंतर १० ते १०० मीटर राहील. (नकाशा पहावे व प्रत्यक्ष पाहणी करावी)
६. सदर कामासाठी लागणारे साहित्य (उदा. कटर, कोयती, कुऱ्हाड इ.) व वाहतुकीसाठी लागणारे साहित्य कंत्राटदाराने स्वत: उपलब्ध करावयाचे आहे.
७. सदर काम करताना कामागारांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पुर्णत: कंत्राटदाराची राहील.
८. सदर काम पुर्ण झाल्याशिवाय कामाचे देयक अदा करण्यात येणार नाही.
९. सदर काम अर्धवट सोडल्यास कोणतेही देयक अदा करण्यात येणार नाही.
१०. सदर काम पुर्ण झाले असे प्रक्षेत्र अधिकारी यांनी प्रमाणित केल्यावरच देयक अदा करण्यात येईल.
११. वरील कामा संदर्भात नजर चुकीने राहिलेल्या संबंधित कामांबाबत (सदर प्रक्षेत्र पुर्णपणे साफ करण्यासाठी) प्रकल्प प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील व ते सांगतील त्याप्रमाणे काम करावे लागेल.
१२. सदर काम पंधरा दिवसात व अपरीहार्य कारणास्तव जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत पुर्ण करावे लागेल.
१३. दरपत्रका सोबत ठेकेदाराने आपले आधार कार्ड व पॅन कार्ड यांची छायांकीत प्रत जोडण्यात यावी.

आपला विश्वासु


सहयोगी अधिष्ठाता



Scanned with CamScanner

**AICRP-PEASEM प्रक्षेत्रावरील झाडे तोडणी आराखडा / नकाशा**

पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग,






Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

AICRP on Plastic Engineering in Agriculture Structure and Environment Management (PEASEM)
Department of Farm Structures,
College of Agricultural Engineering and Technology
D.B.S.K.K.V.,DAPOLI, DIST. RATNAGIRI MS. 415712
Phone: (02358) 282414; Tele-Fax: (02358) 282414
Email : aicrp.petdapoli@gmail.com

# दरपत्रक नमुना

प्रति,

मा. सहयोगी अधिष्ठाता,
कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
दापोली, जि. रत्नागिरी

**विषय:** AICRP- PEASEM प्रक्षेत्रावरील झाडे तोडण्यासाठी व तोडलेली लाकडे एका ठिकाणी ठेवण्यासाठी कंत्राटी पध्दतीने काम करून देणेकरीता दरपत्रक ...

**संदर्भ:** जा.क्र.कृअतंम/प्रसंवि/पीईएएसईम/दरपत्रक/ /२०२०, दिनांक:

महोदय,

आपल्या कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोलीच्या AICRP- PEASEM च्या संशोधन प्रक्षेत्रावरील काजुची झाडे व बांबुची बेटे तोडणे, बांधावरील अडथळा आणणारी झाडे छाटणे तसेच तोडलेली लाकडे एका ठिकाणी ठेवणे या कंत्राटी कामांसाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार या योजनेत खालील नमुद केलेले कामे करण्यास मी इच्छुक आहे. तरी नमुद केलेल्या कामासाठी माझ्या रकमेचे दरपत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | किंमत (रू.) |
|---|---|---|
| १. | **अ.** प्रक्षेत्रावरील १६२ काजूची झाडे जमिनीपासुन अर्धा फुट अंतरावर तोडणे, तसेच तोडलेल्या झाडांपासुन **१ इंच पेक्षा जास्त जाडी** असलेले लाकडे वेगळी करणे व त्याचा ढिग लाकडांच्या जाडी प्रमाने नेमुन दिलेल्या एकाच ठिकाणी लावून ठेवणे. तसेच लाकडे वेगळे केल्यानंतर उरलेला पाळापाचोळा व बारीक फांद्यासह नेमुन दिलेल्या जागेवर एका ठिकणी गोळा करणे. लाकडाचा ढीग २ मीटर रूंदीच्या, २ मीटर उंचीच्या आणि लांबी गरजेनुसार जागेत लावणे.<br>**ब.** लावलेले बांबूचे १० बेटे जमिनीपासुन अर्धा फुट उंचीवर तोडणे व शेंडयापासुन बांबु वेगळा करणे व त्याचा ढिग एकाच ठिकाणी लावून ठेवणे. तसेच बांबुचा राहीलेला पाळापाचोळा इतर पाळापाचोळयाबरोबर टाकणे.<br>**क.** प्रक्षेत्राच्या बांधावरील अडथळे आणणारे ११ झाडे जमिनीपासुन ११ फुट अंतरावर छाटणे तसेच छाटलेली मोठी लाकडे नमुद केलेल्या जागेवर ३ मीटर रूंदीच्या, २ मीटर उंचीच्या आणि लांबी गरजेनुसार लावुन ठेवणे.<br>**(प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर भेट देऊन कामाची पाहणी करून व प्रक्षेत्र अधिकारी यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करून दरपत्रक सादर करीत आहे.)** | **अंकात**<br>**रू.**<br>................./-<br>(अक्षरी रू.........<br>......................<br>......................<br>.............) |
| **अक्षरी रू.** | **एकुण रू.** | |



Scanned with CamScanner

मी कंत्राटी पध्दतीने वरील कामे करण्याच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी सदर कामांची प्रत्यक्ष पाहणी करूनच व प्रक्षेत्र अधिकारी यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करून मी दरपत्रक सादर करीत आहे. सदर काम करताना लागणारे साहित्य व कामगारांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पुर्णपणे माझ्यावर राहील. सदर काम पंधरा दिवसात पुर्ण करण्यात येईल. सदर काम अर्धवट सोडल्यास त्याचे कोणतेही देयक अदा करण्यात येणार नाही याची मला पुर्णत: जाणीव आहे. तरी सदर कामाने माझे दरपत्रक मंजुर व्हावे ही विनंती.

ठेकेदाराचे नांव व सही

ठेकेदाराचे नाव:......................................................

पत्ता: ...........................................................

...........................................................

...........................................................

मोबाईल नं. : ......................................................



Scanned with CamScanner